ISSN 2319 - 359X
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
HALF YEARLY RESEARCH JOURNAL

Peer Reviewed Referred and
UGC Listed Journal No. 47026

ISO 9001 : 2015 QMS
ISBN / ISSN

# IDEAL

Single Blind Review/Double Blind Review



Volume - XII, Issue - I
March - August - 202
Marathi Part - V

Impact Factor / Indexing
2023 - 7.537
www.sjifactor.com

Ajanta Prakashan

VOLUME - XII, ISSUE - II - MARCH - AUGUST - 2024
**IDEAL - ISSN - 2319 - 359X - IMPACT FACTOR - 7.537** (www.sjifactor.com)

Late Ramesh Warpudkar Arts, Commerce & Science College, Sonpeth Dist.Parbhani (M.S.)



# CONTENTS OF MARATHI PART - V


| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | भारतीय निर्वाचन आयोग आणि निवडणूक विषयक सुधारणा<br>**प्रा. डॉ. गोलेकर के. एम.** | १-७ |
| २ | पाकिस्तान निवडणूक २०२४ राजकीय विश्लेषण<br>**प्रा. डॉ. बापुराव आंधळे** | ८-१३ |
| ३ | भारतातील सुशासन आणि नवीन शैक्षणिक धोरण<br>**शाम गंगाधर आवटे** | १४-१६ |
| ४ | नवीन शैक्षणिक धोरण संधी आणि आव्हाने<br>**डॉ. रामदास धोंडबाराव मुक्टे** | १७-२२ |
| ५ | राष्ट्रीय शैक्षणिक धोरणातून साध्य करावयाची एकविसाव्या शतकातील अध्ययन कौशल्य<br>**डॉ. सोमनाथ श्रीरंग राऊत** | २३-२७ |
| ६ | राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखड्यात प्रतिबिंबित होणारे शालेय शिक्षण<br>**डॉ. एल. पी. हिंडोळे** | २८-३३ |
| ७ | प्रसारमाध्यमे आणि मराठी भाषा<br>**प्रा. सबाना हमीद तडवी** | ३४-३८ |
| ८ | NEP 2020 आणि विद्यार्थी कल्याण धोरण<br>**कु. भाग्यशाली अर्जुन घोंगडे**<br>**प्रा. डॉ. टी. आर. फिसफिसे** | ३९-४४ |
| ९ | नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०: स्वरूप, संधी आणि आव्हाने<br>**प्रा. बंडू पाटेकर** | ४५-५० |
| १० | ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थेचे ग्रामीण विकासातील महत्त्व<br>**चंद्रकांत निरंजन पुरी**<br>**प्रा. डॉ. संजय गायकवाड** | ५१-५५ |
| ११ | राष्ट्रीय शैक्षणिक धोरण -२०२०आणि ग्रामीण विकास<br>**प्रा. डॉ. राठोड ईश्वर लक्ष्मण** | ५६-६० |
| १२ | ई- गव्हर्नन्स<br>**प्रा. आनंद वैजनाथ साबणे** | ६१-६३ |
| १३ | मराठवाड्यातील चालुक्यकालिन मंदिरस्थापत्य कला<br>**प्रा. डॉ. महेंद्र घनसावंत** | ६४-६७ |

VOLUME - XII, ISSUE - II - MARCH - AUGUST - 2024
**IDEAL - ISSN - 2319 - 359X - IMPACT FACTOR - 7.537 (www.sjifactor.com)**



# २. पाकिस्तान निवडणूक २०२४ राजकीय विश्लेषण

Sopneth Dist.Parbhani (M.S.) Ramesh Warpudkar Arts Science

**प्रा. डॉ. बापुराव आंधळे**
राज्यशास्त्र विभाग, के. रमेश वरपुडकर महाविद्यालय, सोनपेठ, जि.- परभणी.

**प्रस्तावना**

भारत आणि पाकिस्तान हे दोन्ही देश एकदाच स्वतंत्र झाले.तेव्हापासून भारत आणि पाकिस्तान मध्ये लोकशाही शासन व्यवस्था स्वीकारण्यात आली. परंतु पाकिस्तान मध्ये लोकशाही म्हणावी तशी रूजली नाही. याउलट तिथे लष्करशाहीचा वरचष्मा राहिला.अनेक लष्करशहांनी पाकिस्तानची सत्ता ताब्यात घेतली.सन २०१८ साली पाकिस्तान नॅशनल असेंबलीच्या सार्वत्रिक निवडणुका झाल्या व त्यानंतर क्रिकेटर इम्रान खान यांनी निवडणुकिच्या माध्यमातून सत्ता हाती घेतली.त्यानंतर पंतप्रधान इम्रान खान यांच्यावर भ्रष्टाचाराचे आरोप झाले.त्यांना त्यामुळे जेलमध्ये जावे लागले. त्यानंतर नवाब शरीफ यांचे बंधू शहाबाज शरीफ हे पाकिस्तानचे पंतप्रधान झाले. १५ व्या नॅशनल असेंब्लीचा कार्यकाळ पूर्ण झाल्यामुळे आता पाकिस्तानमध्ये नॅशनल असेंबलीच्या सार्वत्रिक निवडणुका झाल्या आहेत.प्रस्तुत निवडणुकीचा राजकीय विश्लेषणात्मक अभ्यास या शोधनिबंधात करण्यात येणार आहे.

भारत जगातील सर्वात मोठी लोकशाही म्हणून आज पुढे आला आहे. येणाऱ्या एप्रिल २०२४ मध्ये भारतात सुद्धा संसदेच्या सार्वत्रिक निवडणुका होऊ घातल्या आहेत. या निवडणुकीमध्ये ज्या पक्षाला बहुमत मिळेल तो पक्ष भारतामध्ये आपली सत्ता स्थापन करेल; परंतु या अगोदर पाकिस्तान मध्ये तेथील नॅशनल असेंबलीच्या सार्वत्रिक निवडणुका पार पडल्या. भारताचा एक शेजारी व भारताचा पारंपारिक शत्रू म्हणून पाकिस्तानचा उल्लेख केला जातो. त्यामुळे पाकिस्तानातील कोणत्याही हालचालीवर प्रत्येक भारतीयाचे बारीक लक्ष असते. पाकिस्तानात घडणाऱ्या प्रत्येक घटनेचा विचार भारतीय नागरिक करतो. त्यात या १६ व्या नॅशनल असेंबलीच्या निवडणुकांचे निकाल हा भारतीय नागरिकांसाठी अत्यंत महत्त्वाचा विषय आहे. भारत आणि पाकिस्तान या दोन्ही देशात लोकशाही जर यशस्वी झाली तर त्यांच्यातील शत्रुत्वाचे संबंध मित्रत्वात परिवर्तित व्हायला वेळ लागणार नाही.असा काही लोकांचा कयास आहे. म्हणून पाकिस्तान मध्ये ज्या निवडणुका झाल्या त्याचे राजकीय विश्लेषण करणे आवश्यक आहे.

पाकिस्तान संघराज्यात्मक संसदीय शासन प्रणाली अस्तित्वात आहे. पाकिस्तान हे एक इस्लामिक गणराज्य आहे. या गणराज्याचा प्रमुख राष्ट्रपती असतो. जो पाकिस्तानच्या सैन्याचा प्रमुखही आहे. तसेच पाकिस्तानच्या कायदे मंडळाचे सिनेट हे वरिष्ठ सभागृह आहे. आणि कनिष्ठ सभागृह नॅशनल असेंब्ली हे सभागृह आहे. अनुक्रमे यांची सभासद संख्या १०० आणि ३३६ अशी आहे. पंतप्रधानाची निवड कनिष्ठ सभागृहातील निवडून आलेल्या सदस्यांमधून बहुमताने केली जाते. पाकिस्तानमध्ये आजपर्यंत तीन राज्यघटना १९५६, १९७३, आणि १९८१ ,चार सैनिकी शासन यामध्ये जनरल आयुब खान १९५८-६९, जनरल याहया खान १९६९ -७१ जनरल जिया उल हक १९७८-८८आणि जनरल परवेज मुसर्रफ २००१-२००८ आणि २७ पंतप्रधान झाले आहेत. यामध्ये

एकाही पंतप्रधानांने आपला पाच वर्षांचा कार्यकाळ पूर्ण केला नाही.एकुण पाकिस्तानच्या राजकीय परिस्थितीला अस्थिरतेचा शाप लागलेला आहे असेच म्हणावे लागेल.

**निवडणुक कार्यक्रम २०२४**

१५ डिसेंबर २०२३ रोजी पाकिस्तान निवडणूक आयोगाने १६ व्या नॅशनल असेंबलीच्या सार्वत्रिक निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर केला. त्यानुसार पाकिस्तान मध्ये ८ फेब्रुवारी २०२४ रोजी सार्वत्रिक निवडणुकांसाठी मतदान झाले. यामध्ये नोंदणी करत १२ कोटी ८५ लाख ८५ हजार ७६० मतदारांनी नोंद करण्यात आली. यापैकी एवढ्या मतदारांनी आपल्या मतदानाचा हक्क बजावला. जो ४७.८% एवढा आहे. नॅशनल असेंबलीच्या एकूण ३३६ सदस्यांमध्ये एकल सदस्य मतदार संघातून २६५ सर्वसाधारण जागांवर निवडणुका घेण्यात आल्या. ज्यामध्ये एका जागेवर निवडणूक झाली नाही. यातील ६० जागा महिलांसाठी राखीव तर १० जागा अल्पसंख्यांक धर्मीयांसाठी राखीव आहेत. सरकार स्थापन करण्यासाठी कोणत्याही पक्षाला १३५ जागा जिंकणे आवश्यक आहे. प्रामुख्याने या निवडणुकीमध्ये तीन प्रमुख पक्ष्यांनी निवडणुका लढवल्या. यात पाकिस्तान मुस्लिम लीग ज्याचे नेतृत्व माजी पंतप्रधान नवाज शरीफ हे करतात. पाकिस्तान तहरिक ए इन्साफ या पक्षाचे प्रमुख इम्रान खान हे आहेत. तर तिसरा प्रमुख पक्ष पाकिस्तान पीपल्स पार्टी हा आहे. ज्याचे नेतृत्व बिलावल भुट्टो हे करत आहेत.याशिवाय पाकिस्तानमध्ये इतरही लाहान पक्ष आहेत.

**निवडणुकांचे निकाल**

पाकिस्तान निवडणूक आयोगाने ११ फेब्रुवारी २०२४ रोजी जाहीर केलेल्या निकालानुसार पाकिस्तान तहरिक ए इन्साफ या इमरान खान यांच्या पक्षाला ९३ जागा मिळाल्या.ज्याला राजकीय पक्ष म्हणून मान्यता नव्हती पण अपक्ष म्हणून यांनी निवडणूक लढविली. तर नवाज शरीफ यांच्या पाकिस्तान मुस्लिम लीगला (एन) ७३ जागा मिळाल्या आणि पाकिस्तान पीपल्स पार्टीला ५४ जागा मिळाल्या आहेत. फजल उर रहमान या पक्षाला ०३ आणि इतर लहान पक्षांना व अपक्षांना मिळून ३३ जागा मिळाल्या आहेत. यामुळे पाकिस्तान असेंबली मध्ये कोणत्याही पक्षाला स्पष्ट असे बहुमत मिळाले नाही.

**सरकार स्थापन**

पाकिस्तानमध्ये सरकार स्थापन करण्यासाठी कोणत्याही एका पक्षाकडे बहुमत नसल्यामुळे सरकार स्थापन करण्यास विलंब लागला. आणि शेवटी मुस्लिम लीग नवाब शरीफ गट आणि पाकिस्तान पीपल्स पार्टी बिलावल भुट्टो गट आणि फजल उर रहमान या पक्षांनी एकत्रित येऊन संयुक्त सरकारची स्थापना केले. आणि नवाब शरीफ यांचे बंधू शहाबाज शरीफ हे पाकिस्तानचे पंतप्रधान झाले. त्यांना नॅशनल असेंबली मध्ये २०१ एवढे मते मिळाली तर त्यांच्या विरोधात असलेल्या इम्रान खान गटाचे उमर अयुब खान यांना ९२ एवढी मते मिळाली.शहाबाज शरीफ हे दुसऱ्यांदा पाकिस्तानचे पंतप्रधान झाले आहेत. ते पुढील पाच वर्षे सरकार यशस्वीपणे चालवतील आणि पाकिस्तानला राजकीय अस्थिरतेतून बाहेर काढून स्थिर सरकार देतील अशी आशा बाळगायला हरकत नाही.

VOLUME - XII, ISSUE - II - MARCH - AUGUST - 2024
IDEAL - ISSN - 2319 - 359X - IMPACT FACTOR - 7.537 (www.sjifactor.com)



Late Ramesh Warpudkar Arts, Commerce & Science College, Sonpeth Dist.Parbhani

**राष्ट्रपती पदाची निवड**

पाकिस्तानच्या राज्यघटनेतील तरतुदीनुसार नॅशनल असेंबली ची निवड झाल्यानंतर तेथील राष्ट्रपतीची सुद्धा निवड केली जाते. सिनेट, नॅशनल असेंबली आणि चार घटक राज्य यांच्या प्रतिनिधींकडून राष्ट्रपती पदाची निवड होत असते.

दिनांक ९ मार्च २०२४ रोजी पाकिस्तानच्या राष्ट्रपती पदासाठीची निवडणूक पार पडली. यामध्ये राष्ट्रपती पदासाठी पाकिस्तान पीपल्स पार्टीचे सहअध्यक्ष आसिफ अली जरदारी यांना ४११ एवढी मते मिळाली. तर त्यांच्या विरोधात उभे असलेले महमूद खान अचकजई यांना १८१ एवढी मते मिळाली. यामुळे आसिफ अली जरदारी यांची पाकिस्तानचे १४ राष्ट्रपती म्हणून निवड झाली. त्यांना दिनांक १० मार्च २०२४ रोजी पाकिस्तानचे सरन्यायाधीश काजी फैज ईसा यांनी पद आणि गोपनीयतेची शपथ दिली.

एकूण पाकिस्तानमध्ये लोकशाही मार्गाने निवडणुका होऊन पंतप्रधान, राष्ट्रपती यांनी आपली सत्ता हाती घेतली आहे. येणाऱ्या काळात हे सरकार किती यशस्वीपणे काम करेल हे आपणाला पाहावे लागेल.

**समारोप**

पाकिस्तानच्या स्वातंत्र्यानंतर तिथे लोकशाही स्थिर झाली नाही परंतु आज काही कालावधीनंतर पाकिस्तान मध्ये निवडणुका होऊन लोकशाही मार्गाने शहाबाज शरीफ यांची पंतप्रधान म्हणून आणि आसिफ आली जरदारी यांची राष्ट्रपती म्हणून निवड झाली आहे. येणाऱ्या काळात हे सरकार किती यशस्वीपणे काम करून पाकिस्तानात लोकशाही शासन व्यवस्थेचा मार्ग सुकर करील हे आपणाला येणाऱ्या काळात समजेल.

सध्याच्या परिस्थितीमध्ये पाकिस्तान मध्ये आर्थिक, सामाजिक, राजकीय इत्यादी क्षेत्रात मोठ्या प्रमाणात अस्थिरता दिसून येते. पाकिस्तानला पुनश्च एकदा एक सक्षम लोकशाही राष्ट्र म्हणून पुढे आणण्यासाठी या सरकारची भूमिका महत्त्वाची ठरणार आहे. तसेच भारत आणि पाकिस्तान यांच्यातील परस्पर संबंध वृद्धिंगत करण्यासाठी सुद्धा या सरकारची भूमिका महत्त्वाची ठरणार आहे.

**संदर्भ सूची**

१. भारत विभाजन और पाकिस्तान के षडयंत्र – बलबीर दत्त
२. भारत पाक संबंध – कृष्ण कुमार रातु
३. ऑंखो देखा पाकिस्तान – कमलेश्वर
४. www.bbc.com
५. www .Wikipedia .com
६. www.aajtak.com
७. https .Youtube .com
८. दैनिक लोकसत्ता
९. दैनिक लोकमत
१०. साप्ताहिक साधना